पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template				
विभागाचे नाव			**सामान्य प्रशासन विभाग**	
अ. क्र.	**प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping)**	**बाब**	**माहिती**	**शेरा**
PC१	प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process Identification and Classification)	प्रक्रियेचे **नाव**	**जिल्हा परिषदेकडील वर्ग- 3 व वर्ग-4 निलंबित कर्मचारी यांचे निलंबन कालवधीचा निर्णय घेणे.**	
PC२		कार्यासन **संकेतांक** (उदा. आस्था1, लेखा 4)	**आस्था-६**	
PP१	प्रक्रिया प्रस्तावित करणे (process proposal)	प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी (Maker)- **पदनाम**	**कनिष्ठ सहाय्यक**	
PP२		संदर्भीय कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, न्यायालय निकाल, शासन पुस्तके,पत्रे इत्यादी क्रमांकासह शिर्षक नमुद करावेत.	1.महाराष्ट्र जिल्हा परिषदा , जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 2.महाराष्ट्र जिल्हा परिषदा , जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 **3.महाराष्ट्र नागरी सेवा , पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा बडतर्फ व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने नियम 1981 मधील नियम 70 ते 72 पंरतुकानुसार अ]**महाराष्ट्र नागरी सेवा, पदग्रहन अवधी, स्वियेत्तर सेवा, निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने नियम 1981 मधील नियम 68 मध्ये-शासकीय कर्मचारी अर्धवेतनी रजेवर असता तर त्याला जितके रजा वेतन मिळाले असते, त्या रजा वेतनाइतकी निर्वाह भत्याची रक्कम आणि त्याव्यतिरिक्त त्याला अशा रजा वेतनावर आधारलेला महागाई भत्ता एवढीच रक्कम देता येईल. **ब]**महाराष्ट्र नागरी सेवा, पदग्रहन अवधी, स्वियेत्तर सेवा, निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने नियम 1981 मधील नियम 72 [3] मध्ये-शासकीय कर्मचा-याचे निलंबन संपूर्णपणे असमर्थनीय होते, असे त्याला पुन्हा सेवेत घेण्याचा आदेश देण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-याचे मत असेल तेव्हा, शासकीय कर्मचा-याला निलंबित करण्यात आले नसते तर, जितके वेतन व भत्ते मिळण्यास तो हक्कदार झाला असता तितके पुर्ण वेतन व भत्ते, पोटनियम (8) मधील तरतुदी लक्षात घेऊन त्याला देण्यात येतील. परंतू, शासकीय कर्मचा-याच्या विरुध्द चालू करण्यात आलेली कारवाई समाप्त होण्यास ज्या कारणामुळे विलंब लागला, त्याचा संबंध प्रत्यक्षपणे शासकीय कर्मचा-याशी जोडता येण्यासारखा आहे असे त्या प्राधिका-याचे मत असेल तेव्हा त्या कर्मचा-याला तसे कळविण्यात आल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत अभिवेदन करण्याची संधी दिल्यानंतर व त्याने कोणतेही अभिवेदन केल्यास ते विचारात घेतल्यानंतर आपली कारणे लेखी नमूद करुन तो प्राधिकारी असा निर्देश देऊ शकेल की, त्या कर्मचा-याला अशा विलंबाच्या कालावधीबद्दल वेतन व भत्ते यापोटी तो प्राधिकारी निश्चित करील एवढीच [संपूर्ण नव्हे] रक्कम देण्यात यावी. **क**]महाराष्ट्र नागरी सेवा, पदग्रहन अवधी, स्वियेत्तर सेवा, निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने नियम 1981 मधील नियम 72 [4] मध्ये पोटनियम [3] खाली येणारी प्रकरणांच्या बाबतीत निलंबनाचा कालावधी हा, सर्व प्रयोजनार्थ, कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणून मानण्यात येईल. **ड]** महाराष्ट्र नागरी सेवा, पदग्रहन अवधी, स्वियेत्तर सेवा, निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने नियम 1981 मधील नियम 72 [7] [5]खाली येणा-या प्रकरणी, निलंबनाचा कालावधी हा, कामावर व्यतीत केलेला म्हणून कालावधी मानला जाणार नाही. मात्र, सक्षम प्राधिका-याने एखादया विनिर्दिष्ट प्रयोजनाकरता हा कालावधी कामावर व्यतीत करण्यात आलेला कालावधी म्हणून मानण्यात यावा असा विशिष्ट निर्देश दिला तर तो तसा मानला जाईल. पंरतू, शासकीय कर्मचा-याची तशी इच्छा असेल तर, असा सक्षम प्राधिकारी निलंबनाचा कालावधी हा, त्या कर्मचा-याला देय व अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही प्रकारच्या रजेमध्ये रुपांतरीत करण्यात यावा असा आदेश देऊ शकेल.	
		प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे — **लाभार्थी/ व्यक्तींची वैयक्तिक कागदपत्रे**		

पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template

विभागाचे नाव	सामान्य प्रशासन विभाग				
अ. क्र.	**प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping)**	**बाब** **कागदपत्रे**		**माहिती**	**शेरा**
PP३	प्रक्रिया प्रस्तावित करणे	**उदा. विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड**	**कार्यालयीन कागदपत्रे**	**असे विभागीय स्तरावर प्रस्ताव सादर करताना काय बाबी पहावयाच्या** **१. निलंबन होवून १ वर्षापेक्षा अधिक कालावधी होणे आवश्यक.** **२. विभागीय चौकशी सुरु/ पूर्ण होणे आवश्यक.** **३. फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्याने पोलीस यंत्रणेमार्फत न्यायालयात दोषारोप पत्रे दाखल करणेत आली आहे का?** **४.न्यायालयीन प्रकरणाची सद्यस्थिती** **५. आरोपाचे गांभीर्य पाहता सेवेत पुर्नस्थापित करणे योग्य आहे किंवा कसे ?**	
PP४		प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम, कामाचे वार्षिक नियोजन, परीक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प , विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी		**लागू नाही**	
PP५		प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पंस/ ग्रापं/ जि. प. कडील अन्य क्षेत्रीय कार्यालये तसेच शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे / महामंडळे / मनपा/ नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था यांचेकडून प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस		**लागू नाही**	
PP६		तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ/क.प्र.अ/ पर्यवेक्षीय अधिकारी)		**१.सहाय्यक प्रशासन अधिकारी जि प पुणे**	
PP७		प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी		**pp३ नुसार**	
PA१	प्रक्रिया मंजुरी (process approval)	मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख /इतर)		**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)जि प पुणे**	
PA२		यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव		**लागू नाही.**	
PA३		Endorsement (समर्थन) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ /अति मुकाअ/ संबधित खातेप्रमुख)		**लागू नाही.**	

पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template				
विभागाचे नाव			**सामान्य प्रशासन विभाग**	
अ. क्र.	**प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping)**	**बाब**	**माहिती**	**शेरा**
PM१	प्रक्रिया त्रुटीशोध (process Mapping)	मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या त्रुटी	**लागू नाही.**	
PI१	प्रक्रिया सुधारणा (process improvization)	अचुकता वेळेची बचत , मनुष्यबळ कार्यक्षम वापर , पारदर्शकता याकरिता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोग्या उपप्रक्रिया /बाबी	**लागू नाही.**	
PI२		तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम	**होय**	
PI३		मुळ संकल्पना, उद्देश , लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करायच्या बाबी	**लागू नाही.**	